Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- VII | ISSUE- IV | APRIL | 2020 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 6.293 | ISSN 2349-638x

# सप्तशृंगी गड एक धार्मिक पर्यटनस्थळ ,विश्लेषणात्मक अभ्यास

प्रवीण पोपटराव शार्दुल

सहाय्यक प्राध्यापक

कर्मवीर आबासाहेब तथा

ना.म.सोनवणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

सटाना, ता.बागलान जि.नाशिक (महाराष्ट्र)

प्रस्तावना -

देशाच्या आर्थिक विकासात पर्यटन उद्योगाची भूमिका ही महत्वाची व निर्णायक ठरणारी असल्याचे दिसून येते.अतिशय वेगाने विकास करनारा आणि भरपुर उत्पन्न मिळवून देणारा जगातील अक मोठा उद्योग म्हणून पर्यटन उद्योगाचे योगदान महत्वाचे दिसून येते.विदेशी चलन प्राप्ती आणि व्यवहारतोल असंतुलन यासारख्या समस्याच्या निरकरणात पर्यटन उद्योग महत्वाची भूमिका बजावते.भारतात प्राचीन काळापासून पर्यटकांना आकर्षित केले जाते आहे.भारत हा बहू धार्मिक आणि बहु सांस्कृतिक असल्याने आभ्यासासाठी व धार्मिक नैसर्गिक पर्यटनासाठी देशी विदेशी पर्यटक कायम भेटी देत असतात.पर्यटनाचे विविध रुपे पाहायला मिळतात निसर्ग पर्यटन,कृषि पर्यटन,धार्मिक पर्यटन,ऐतिहासिक पर्यटन ,सागरी पर्यटन ,कृषि पर्यटन होय. धार्मिक कार्य,धार्मिक विधी,नवस,श्रद्धा,इच्छापूर्ती,इ.धार्मिक उद्देशाने केलेले पर्यटन म्हणजे धार्मिक पर्यटन होय.भारतातील काही धार्मिक स्थळांना निसर्गाची साथ लाभलेली आहे. महाराष्ट्रातील नाशिक जिल्हातील 'सप्तशृंगी गड' हे धार्मिक पर्यटन स्थळ असून याला नैसर्गिक पर्यटन स्थळाची वैशिष्ट देखील लाभलेली आहे.हे स्थान नाशिक पासून उत्तरेस ५५ कि.मी. अंतरावर दिंडोरी कळवण तालुक्याच्या सरदहद्दीवर आहे.हे स्थान सह्याद्रीच्या पूर्व पच्छीम डोंगर रांगात आहे.निसर्ग पर्यटन व धार्मिक पर्यटनाच्या उद्देशाने येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या विचारात घेता पर्यटन व्यवसायाच्या विकासात येथे मोठी संधि असल्याचे दिसून येते.

बीज संज्ञा - धार्मिक पर्यटन ,नैसर्गिक पर्यटन , समस्या व उपाय योजना .

उदीष्टे-

१) सप्तशृंगी गड या धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे.

२) सप्तशृंगी गड या धार्मिक पर्यटन स्थळ समस्या व उपाय योजना यांचा अभ्यास करणे.

अभ्यास क्षेत्र -

सदर शोध निंबधासाठी आभ्यासक्षेत्र नाशिक जिल्हातील कळवण तालुक्यातील

'सप्तशृंगी गड असून हे स्थान नाशिक पासून उत्तरेस ५५ की.मी.अंतरावरील दिंडोरी-कळवण तालुकाच्या सरहद्दीवर आहे.हे स्थान सह्याद्रीच्या पूर्व -पचिम डोंगर रांगेत वसलेले आहे.सह्याद्रीच्या पठारावर असलेले हे ठिकाण समुद्रसपाटी पासून सुमारे ४५६९ फुट उंचीबर आहे.विस्तार २०°२३ २५ उत्तर अक्षवृत्त आणि ७३°५४ ३१ पूर्व रेखावृत्त हा आहे. येथील परिसर हा घनदाट वृक्षांनी व डोंगर रांगांनी वेढलेला आहे.त्यामुळे निसर्ग पर्यटक व धार्मिक पर्यटक यांची कायम संख्या जास्त असते.

संशोधन पद्धती -

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती श्रोत हा प्राथमिक व दुय्यम माहिती पद्धतीचा असून प्रत्यक्ष भेटी,निरीक्षण ,व द्वितीय श्रोत हे संदर्भ पुस्तके ,मासिके ,वर्तमानपत्र,इंटरनेट ट्रस्ट रेकॉर्ड यांच्या द्वारे प्राप्त केली आहे.

विषय विवेचन -

नाशिक जिल्हा हा अगदी सुरवतीपासून धार्मिक पर्यटन स्थळ महणून ओळखला जातो.यामध्ये सुप्रसिद्ध सप्तशृंगी गड हे धार्मिक पर्यटांनाच्या दृष्टीने महत्वाचे स्थळ आहे.नाशिक जिल्हातील सप्त शृंगी देवीचे मंदिर पुराणात ऊल्लेख केलेल्या १०८ पिठापैकी अक अर्ध पीठ आहे .महाराष्ट्रातील व इतर राज्यातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान आहे.येथे सप्त शिखरावर वास्त्यव करणारी माता सप्तशृंगी देवी होय.देवीची ८ फुट उंचीची पाषाण मूर्ति असून ती शेंदूर उटीने लेपवण केलेली आहे मूर्तीच्या दोन्ही बाजूने ९ भुजा असून वेगवेगळी आयुधे धरण केलेली आहे.मंदिर हे डोंगर कपारीत उंचावर असून मंदिरात जाण्यासाठी ४७२ पायऱ्या दोन्ही बाजूने आहेत,मंदिराला तीन चंद्र द्वार,पृथ्वी द्वार ,व सूर्यद्वार आहेत.प्राचीन वाड्मयात अशी आख्यायिका आहे की दंडकरण्यात राम सीता वनवासात असताना देवीच्या दर्शनाला आल्याचे बोलले जाते पुराणिक कथा मध्ये महिषासुरचा वध केल्या नंतर देवीने विश्रांतीसाठी येथे वास्त्यव केले.महानुभाव लिळा चरित्रात असा उल्लेख आढळतो की राम रावण युद्धात इंद्रजीत च्या आयुधाणे लक्षम्न मुर्चि पडला त्यावेळी हनुमान याने द्रोणगिरी पर्वत नेला आणि द्रोणगिरी च काही भाग खाली पडला तोच हा सप्तशृंगी गड होय .शबरी विद्येची सुरवात येथून झाली असे मानले जाते .निवृती नाथ यांनी काही दिवस येथे उपासना केल्याचे संगितले जाते.शिवाय सुरतेची लूट केल्यानंतर शिवाजी महाराज देवीच्या दर्शनाला आल्याचे संदर्भ बखरी मध्ये आहेत.येथे सप्तशृंगी देवीच्या मंदीरा बरोबरच काली कुंड,सूर्यकुंड ,शिवतीर्थ ,असे प्राचीन काळात दगडी बारव आहेत. तसेच शितकडा हे भौगोलिक वैशिष्ट पाहण्यासारखे आहे. गडावर चैत्र उत्सव काळात व कोजागिरी पोर्णिमेच्या काळात मोठी यात्रा भरते त्यावेळी देशभरातून लाखो भाविक दर्शनाला येतात.त्याच प्रमाणे येथे निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण केल्याने येथे विविध प्रकारचे वृक्ष ,झाडे झुडपे वेली नि हा परिसर कायम हिरवागार दिसतो.अनेक डोंगर रांगा असल्याने गिरी

भटकंती करणारे,तसेच गिर्यारोहक यांची ही कायम वर्धळ असते.तसेच निसर्गप्रेमी हेही कायम भेट देतात.त्यामुळे खऱ्या अर्थाने धार्मिक पर्यटना बरोबर निसर्ग पर्यटन,गिर्यारोहन पर्यटन.येथे घडून येते. त्यामुळे येथे पर्यटनाचा विकास नक्कीच बघायला मिळतो.येथील पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधि उपलब्ध झाल्या आहेत.तसेच वाहतूकी द्वारे इतर गोष्टी मुळे ग्राम पंचायतीस मोठा महसूल प्राप्त होतो.

वाहतूक व्यवस्था -

गडावर जाण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाणे पक्का रस्ता तयार केला आहे.त्यामुळे अगदी थेट गडावर गाडी नेने सोपे जाते.तसेच रा.प. महामंडळ यांच्या बसेस नाशिक वरुण उपलब्ध असतात.तसेच खाजगी वाहने ही उपलब्ध आहेत.देवीच्या मंदिरात जाण्याकरिता व वयोवृद्ध वक्तीसाठी आशिया खंडातील भारत देशातील पाहिला फर्निकुलर ट्रोलि ची सुविधा उपलब्ध आहे.या सुविधेमुळे अग्दी काही क्षणात आपण देवीच्या गाभर्यात जाऊ शकतो यातून सदर व्यवस्थेला नफा ही मोठ्या प्रमाणात मिळतो.

निवास व्यवस्था -

सप्तशृंगी देवी ट्रस्ट च्या वतीने येथे धर्मशाळा आहे. त्यामध्ये १९० खोल्यांची व्यवस्था आहे.ठराविक शुल्क आकारून तेथे भाविक राहतात॰ त्याच प्रमाणे काही खाजगी हॉटेल आहेत तिथे राहण्याची सोय उपलब्ध आहेत.

भोजन व्यवस्था -

ट्रस्ट मार्फत केवळ १५ रुपये नाममात्र शुल्क घेऊन भाविकांना अन्नदान केले जाते तसेच खाजगी हॉटेल खानावळ यांचीही व्यवस्था उपलब्ध आहे.

समस्या -

१) सप्तशृंगी गड सह्याद्रीच्या पठारावर असलेले हे ठिकाण समुद्रसपाटी पासून सुमारे ४५६९ फुट उंचीबर आहे त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर व मंदिरात डोंगर कडा विदारनाने कोसळतात.
२) यात्रा काळात व इतर वेळी गडावर नेहमी घन कचरा पडलेला दिसतो त्यातून मोठ्या प्रमणात भू प्रदूषण होते
३) यात्रा काळात भाविक मोठ्या प्रमाणात तेथील जलकुंडात स्नान करतात निर्माल्य टाकतात . त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी प्रदूषित होतेव अनेक आजार त्यातून निर्माण होतात व रोगराई पसरते.
४) प्रवाशी भविकासाठी योग्य बसस्थानक नाही त्यामुळे यात्रा काळात प्रचंड हाल होतात.
५) भविकासाठी स्नान गृहेशोचालये,नसल्याने व योग्य मल्ल निस्सारण व्यवस्था नसल्याने प्रदूषण मोठ्या प्रमाणात घडून येते

उपाय योजना -

१) डोंगर कडा कोसळतात म्हणून भूगोल व भू गर्भ तज्ञ तसेच स्थापत्य अभियांत्रिकी ,हवामान तज्ञ यांची मदत घेऊन कायम स्वरूपी प्रतिबंधात्मक उपाय योजना करावी.

२) कचरा,निर्माल्य यांची योग्य व्हीलेवाट लावावी किवा त्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा कार्यान्वित करावी.

३) जल कुंडातील पाणी कायम निर्जुतिकीकरण करावे व निर्माल्य व स्नान करण्यास प्रातिबंध करावा.

४) आरोग्य सुविधा लसीकरण रोग प्रातिबंध यांची अमलबजावणी करावी.

५) भाविकांना सर्व सुविधा युक्त बस स्थानक उपलब्ध करून द्यावे.

६) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या मार्फत पर्यटकांना माफक दरात राहण्याची व जेवणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

निष्कर्ष -

प्रस्तुत शोध निंबधाच्या आभ्यासा अंती असे निष्कर्ष निघतो की नाशिक जिल्हयातील सप्तशृंगी गड हे धार्मिक व नैसर्गिक पर्यटांनाच्या विकासात महत्वपूर्ण आहे.येथील धार्मिक पुराणिक व ऐतिहासिक नैसर्गिक महत्व असल्यामुळे पर्यटकांची कायम वर्दळ येथे बगायला मिळते.येथील पर्यटांनातून स्थानिक लोकांना रोजगार मिळून त्यांच आर्थिक विकास होतो. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व महाराष्ट्र शासन यांच्या सयुक्त प्रयत्नाने या ठिकाणी अजून चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या तर येथील पर्यटनाला अजून चालना मिळून खऱ्या अर्थाने पर्यटनाचा विकास करता येईल.व त्याच प्रमाणे प्रादेशिक व आर्थिक विकास साधता येईल.

संदर्भ -

१) पर्यटन भूगोल : डॉ.अंकुश आहेर, प्रा.डी.एम.मारकड.
२) सप्तशृंगी ट्रस्ट माहिती पुस्तिका
३) दैनिक वृत्तपत्रे
४) बेवसाईट .